घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध आहा.. स्वस्थ रहा
नवल
शुद्ध तूप
म्हशीचे व गायीचे साजुक तूप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.१८६ ■ शुक्रवार १० एप्रिल २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## खरात प्रकरणात प्रतिभा चाकणकरांची चौकशी होणार
## कोट्यावधींच्या गैरव्यवहारात पोलिस नोटीस पाठवणार

**अहिल्यानगर, दि.९- नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरातला एसआयटीने आज पुन्हा न्यायालयात हजर केले. त्यावेळी न्यायालयाने अशोक खरातला आणखी पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. त्यामुळे खरातचा पोलिसांच्या तावडीतील मुक्काम आणखी वाढला आहे. खरातवर एकूण १२ गुन्हे दाखल असून एसआयटीने न्यायालयातून आज लगेचच तिसऱ्या गुन्ह्यात त्याचा ताबा घेतला. सरकारवाडा पोलिस ठाण्यात दाखल असलेला हा तिसरा गुन्हा अत्यंत गंभीर असून, एका सात महिन्यांच्या गरोदर महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप खरातवर आहे. प्रसूती सुरळीत व्हावी आणि मुलगाच होईल, असे आमिष दाखवत त्याने महिलेवर अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. एकीकडे खरातची कसून चौकशी सुरू असताना दुसरीकडे खरातशी संबंधितांनाही पोलिसांकडून नोटीस बजावली जात आहे. त्यात प्रतिभा चाकणकरांचा समावेश असल्याचे सांगण्यात येते.**


अशोक खरातशी जवळीक असल्याच्या कारणावरुन रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर रुपाली चाकणकर यांना एसआयटी पथकाने नोटीसही बजावल्याची माहिती होती. मात्र, अद्याप त्यांची कुठलीही चौकशी झाली नाही. आता रुपाली चाकणकर यांची बहीण प्रतिभा चाकणकर यांना शिर्डी पोलिस नोटीस बजावणार असल्याची माहिती आहे. समता पतसंस्थेतील खात्यांसदर्भात पोलिस त्यांची चौकशी करणार आहेत. समता पतसंस्थेत प्रतिभा चाकणकर यांचे देखील चार खाते आहेत. प्रतिभा चाकणकर यांच्या नावे दोन तर त्यांच्या मुलांच्या नावे दोन खाती आहेत. विशेष म्हणजे, या चार खात्यांवर २ कोटी ४० लाख रुपयांचा व्यवहार झाल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांच्या हाती लागल्याने आता या पैशांसदर्भात आणि आर्थिक व्यवहाराची सखोल चौकशी होणार आहे.

समता पतसंस्थेत भोंदू अशोक खरात नॉमिनी असलेले शंभर खाते तर सिन्नर येथील जगदंब पतसंस्थेत खरात नॉमिनी असलेले ३२ खाते आहेत. सिन्नर येथील (पान ४ वर)

## पुदुच्चेरीत सर्वाधिक ८९ टक्के मतदान

नवी दिल्ली, दि.९- आसाम, केरळ आणि पुदुच्चेरीमधील आज विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पाडले. गुरुवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार मतदारांनी मतदानाला जोरदार प्रतिसाद दिली. भारतीय निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, पुदुच्चेरीमध्ये सर्वाधिक ८९.८३ टक्के मतदान झाले, त्याखालोखाल आसाममध्ये ८५.३८ टक्के, तर केरळमध्ये ७८.०३ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, आसाममधील सर्व १२६ विधानसभा मतदारसंघांमध्ये सायंकाळी ६ वाजेपर्यंत अंदाजे ८५.३८ टक्के मतदान झाले आहे. राज्यात अत्यंत चुरशीची लढत होत असून, भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सलग तिसऱ्यांदा सत्तेवर येण्याचा प्रयत्नात आहे, तर काँग्रेस दशकानंतर पुन्हा इथं सत्ता मिळवण्याचे ध्येय बाळगून आहे.

## बारामती पोटनिवडणुकीतून काँग्रेस उमेदवाराची माघार
## राहुरीत भाजप महायुतीकडून अक्षय कर्डीले उमेदवार



**मुंबई, दि.९- राज्याचे लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसने अखेर माघार घेतली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासमोर काँग्रेसने आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. परंतु,आज आकाश मोरे यांची उमेदवारी मागे घेण्यात आली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेत असल्याचे जाहीर केले. पोटनिवडणुकीतील उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. त्यामुळे सकाळपासून राज्यात राजकीय विविध घडामोडी आणि राजकीय डावपेच पाहायला मिळाले. दुसरीकडे राहुरी मतदारसंघातही शेवटच्या दिवशी अनेक उमेदवारांनी माघार घेतली असून सात उमेदवार रिंगणात कायम आहेत. त्यामुळे कोण होणार राहुरीचा आमदार याची उत्सुकता आहे. बारामती पोटनिवडणुकीत २३ उमेदवार रिंगणात आहेत. मतदान २३ एप्रिलला होणार असून ४ मेस निकाल जाहीर होणार आहे.**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पत्रकार परिषदेत म्हणाले की, दोन पोटनिवडणूका महाराष्ट्रात होत आहेत. यामध्ये बारामतीकडे सर्वात जास्त लक्ष लागले आहे. वैचारिक भूमिका म्हणून भाजपला विरोध करण्यासाठी बारामतीच्या पोटनिवडणूकीत अर्ज भरला होता. बारामती नाही तर देशभरात भाजपच्या विरोधात काँग्रेसने भूमिका घेतली होती. एकूण सहा अर्ज बारामतीसाठी आले होते. परंतु शरद पवार गटाचे आमदार रोहित पवारांनी भल्या पहाटे येऊन बारामतीची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विनंती केली. अजित पवार यांच्या संदर्भात सहकार्याची भूमिका घ्या, अशी विनंती केली. काही जणांनी (पान ४ वर)

## शहादा बसस्थानकात शालेय विद्यार्थिनींमध्ये राडा
## महिलेची दादागिरी; अखेर पोलिसांचा हस्तक्षेप

**शहादा, दि.९ (का.प्र.)- शहादा बसस्थानक परिसरात गुरुवारी दुपारी शाळा सुटण्याच्या वेळेस विद्यार्थिनींच्या दोन गटांत जोरदार राडा झाल्याची घटना घडली. या वादात एका महिलेने उडी घेत दुसऱ्या एका विद्यार्थिनीला मारहाण केल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संबंधितांना ताब्यात घेतले.**



मिळालेल्या माहितीनुसार शहादा शहरात ग्रामीण भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थिनींची गुरूवारी दुपारी बसस्थानक परिसरात मोठी गर्दी होती. यावेळी कोणत्या तरी कारणावरून दोन विद्यार्थिनींमध्ये शाब्दिक चकमक उडाली. या वादाचे रूपांतर बघता बघता हाणामारीत झाले. तितक्यात एका महिलेने या वादात प्रवेश केला आणि तिचा रुद्र अवतार पाहायला मिळाला. या महिलेने एका विद्यार्थिनीला जोरदार मारहाण करण्यास सुरुवात केली. हा प्रकार पाहून बसस्थानकातील प्रवासी थक्क झाले. वाद नेमका कशामुळे सुरू आहे, हे कोणालाही समजत नव्हते. त्या महिलेचा आक्रमक पवित्रा पाहून मध्यस्थी करण्यासाठी कोणीही पुढे येण्याचे धाडस दाखवत (पान ४ वर)

## विष प्राशन केले तरूणीचा मृत्यू

धुळे, दि.९- शिंदखेडा तालुक्यातील तावखेडा येथील एकोणावीस वर्षीय तरूणीने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, तावखेडा गावातील निकीता सुनिल कोळी या एकोणावीस वर्षीय तरूणीने दि.११ मार्च रोजी घरात ठेवलेले विषारी औषध प्राशन केल्याने तिची प्रकृती बिघडली. परिसरातील नागरिकांनी खाजगी वाहनाने ग्रामीण रूग्णालय दोंडाईचा येथे दाखल केले. औषधोपचार करूनही प्रकृती खालावल्याने जिल्हा रूग्णालय नंदुरबार येथे दाखल केले असता उपचार सुरू असतांना दि.१३ मार्च रोजी दुपारी सव्वा चार वाजेच्या सुमारास डॉ.अविन नाईक यांनी तपासून मयत घोषित केले.

## धुळ्यातील बनावट मद्य कारखान्यावर पोलिसांचा छापा
## एक लाख त्रेचाळीस हजारांचा मुद्देमाल जप्त; एक अटकेत

**धुळे, दि.९- शहरातील अंबिका नगरातील हॉटेल चंडीका मागील पत्र्याच्या शेडमध्ये बनावट दारू बनविण्याच्या कारखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा मारला. घटनास्थळावरून दारू बनविण्यासाठी लागणारे साहित्य, रसायन, बाटल्या, स्पिरीट अशा एकुण एक लाख त्रेचाळीस हजार दोनशे नव्वद रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका संशयित इसमाला ताब्यात घेण्यात आले आहे.**



स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीनुसार दि.९ एप्रिल रोजी शहरातील अंबिका नगरातील हॉटेल चंडीका मागील पत्र्याच्या शेडमध्ये छापा मारण्यात आला. या ठिकाणी रविंद्र रमेश महाजन (वय २७) रा.दसेरा मैदान, सहजिवन नगर, धुळे हा त्याच्या सहकाऱ्यांसमवेत मानवी जीवितास अपायकारक ठरणारी बनावट इंम्पेरिअल ब्ल्यु नावाची बनावट दारू तयार करतांना आढळून आला. शेडची पाहणी केली असता तयार केलेली बनावट दारू, बाटल्या, इम्पिरिअल ब्ल्युचे स्टीकर्स, बुच, खोके, रसायन, मोजमापक असा एकुण एक (पान ४ वर)

## आयशरची धडक दुचाकीस्वार ठार

धुळे, दि.९- साक्री तालुक्यातील वाघापूर गावाच्या पुढे भरधाव वेगाने जाणाऱ्या आयशर वाहनाने समोरून येणाऱ्या दुचाकीला धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.सोनु धुळु बोरकर यांनी दि.८ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, साक्री तालुक्यातील वाघापूर गावातील विठ्ठल लहानु मारनर (वय ४०)हे दुचाकी क्र.एमएच १८/सीजे-१३३५ घेवून निजामपूर ते लामकानी रस्त्याने वाघापूर गावाच्या पुढे जात असतांना समोरून भरधाव वेगाने येणारे आयशर वाहन क्र.एमएच२०/इजी-६८६१ ने जोरदार धडक दिल्याने अपघात झाला.



## वार शिवारात शॉर्ट सर्किटमुळे आग
## शेडनेटसह झाडे-झुडपे जळून खाक

**धुळे, दि.९- तालुक्यातील वार येथील शेत शिवारात शॉर्टसर्किटमुळे अचानक भीषण आग लागल्याची दुर्घटना घडली. या आगीत शेतातील दोन मोठी शेडनेट आणि नदीकाठचे गवत व झाडे-झुडपे जळून खाक झाली असून, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. गावकऱ्यांच्या आणि अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग विझवण्यात यश आले असून पुढील अनर्थ टळला आहे.**

वार येथील गट नंबर ४३० व ४२७ मध्ये अचानक विजेच्या शॉर्ट सर्किटमुळे आगीचा भडका उडाला. वाऱ्यामुळे आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केले. पाहता-पाहता ही आग शेतातील दोन मोठ्या 'शेडनेट'पर्यंत पोहोचली आणि ते आगीच्या भक्षस्थानी पडून पूर्णपणे जळून नष्ट झाले. याशिवाय आगीचे लोण नदीकिनाऱ्यापर्यंत पोहोचल्याने तेथील खूप सारे वाळलेले गवत आणि परिसरातील अनेक झाडे-झुडपेही आगीत भस्मसात झाली. आगीची माहिती मिळताच गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली व आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु केले. त्याचवेळी तातडीने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल होत, गावकऱ्यांच्या मदतीने पाण्याचा मारा करून या भीषण आगीवर नियंत्रण मिळवले व आग पूर्णपणे विझवली. अग्निशमन दल आणि (पान ४ वर)

## सुझलॉनची कॉपर वायर लांबवली

धुळे, दि.९- साक्री तालुक्यातील वसंत नगर गाव शिवारातील सुझलॉन कंपनीच्या टॉवर क्र.जे १२८ मधील पासष्ट हजार रूपये किंमतीची कॉपर वायर व ट्रान्सफार्मर बास बार पाच जणांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. वसंत नगर गाव शिवारात असलेल्या सुझलॉन कंपनीच्या टॉवर क्र.जे १२८ येथून रविंद्र अशोक पवार, गणेश पवार, देया ऊर्फ दिवा ठाकरे सर्व रा.ठाणेपाडा, लाश्या ठाकरे, हासिराम ठाकरे व इतर पाच ते सहा जणांनी दि.८ एप्रिल रोजी पहाटे तीन वाजेच्या सुमारास टॉवर मधील पन्नास हजार रूपये किंमतीची कॉपर वायर व पंधरा हजार रूपये किंमतीचा ट्रान्सफार्मर बास बार असा एकुण पासष्ट हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

## गंगाराम हॉस्पिटल ॲण्ड रिसर्चचे एक्केचाळीसव्या वर्षात पदार्पण

**धुळे, दि.९- शहरातील मालेगाव रोड परिसरातील अग्रवाल नगरातील भतवाल सर्जिकल व मॅटर्निटी हॉस्पिटल संचलित गंगाराम हास्पिटल ॲण्ड रिसर्च चे चाळीस वर्ष पूर्ण होवून एक्केचाळीसव्या वर्षात यशस्वीरित्या पदार्पण करीत आहे. दि.१० एप्रिल १९८६ रोजी डॉ.श्रीराम भतवाल व डॉ.गायत्री भतवाल यांनी भतवाल हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून डॉ.आदित्य श्रीराम भतवाल व डॉ.पल्लवी आदित्य भतवाल हे देखील मागील दहा वर्षांपासून अखंड रूग्णसेवेसाठी तत्पर आहेत.**

गेल्या चाळीस वर्षांपासून भतवाल हॉस्पिटल आपल्या परिसरात रूग्ण सेवा करीत असतांना नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करत गॅस्ट्रोस्कोपी १९८५, कोलोनोस्कोपी २००२ तसेच स्वादूपिंडाच्या व पित्तनलिकेत खडे असलेल्या रूग्णांकरीता ईआरसीपी २०१२ या सेवा प्रथमच खान्देशवासीयांसाठी उपलब्ध करून दिल्या तसेच धुळ्यातील पहिले अल्ट्रासोनोग्राफी १९९० साली महिलांच्या अंत्रस्थ अवयवांची तपासणी करण्यासाठी मशीन आणले. १९९३ साली डॉ.श्रीराम भतवाल यांनी उत्तर महाराष्ट्रात पहिल्यांदा लेप्रोस्कोपीक (पान ४ वर)

## ट्रॅक्टर उलटून अपघात युवकाचा जागीच मृत्यू

धुळे, दि.९- साक्री तालुक्यातील टक्कर मौली फाट्याजवळून भरधाव वेगाने जाणारे ट्रॅक्टर उलटल्याने अपघात झाला. या अपघातात ट्रॅक्टरवर बसलेला पंचवीस वर्षीय तरूणाचा गंभीर जखमी होवून जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.टक्कर मौली फाट्याजवळून दि.८ एप्रिल रोजी अकरा वाजेच्या सुमारास ट्रॅक्टर क्र.एमएच १८/-४४६५ घेवून वसंत गुलाब सोनवणे रा.मचमाळा पोस्ट धनेर ता.साक्री जि.धुळे हे सोबत विशाल चुनिलाल बागुल(वय २५) रा.कुरूसवाडे, ता.साक्री,जि.धुळे यांना घेवून भरधाव वेगाने जात असतांना ट्रॅक्टर उलटून अपघात झाला. या अपघातात ट्रॅक्टरवरील विशाल बागुल याचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाला.



## नंदुरबार जिल्हा पोलीस दलात नविन पाच वाहनांचा झाला समावेश

**नंदुरबार, दि.९ (प्रतिनिधी)- जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी ५ नविन वाहनांचा समावेश करण्यात आला आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र दत्तात्रय कराळे यांच्या हस्ते या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.**

नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांच्या नंदुरबार जिल्ह्यातील दोन दिवसीय वार्षिक निरीक्षण दौऱ्यादरम्यान हा कार्यक्रम पार पडला. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेत कायदा व सुव्यवस्था अधिकसक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सूचना दिल्या. शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या या ०५ वाहनांमुळे गुन्हे नियंत्रणात ठेवणे, तातडीने घटनास्थळी पोहोचणे तसेच नागरिकांना जलद व प्रभावी सेवा देणे अधिक सुलभ होणार आहे. या कार्यक्रमास विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, पोलीस उप अधीक्षक मुख्यालय अनील पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदुरबार दत्ता पवार, अक्कलकुवा उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भाये, जिल्हा गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील तसेच जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## लिंगपिसाट खरातवर मोक्का लावा
## ब्लॅकमेलींगसाठी केसचा वापर : गोटे

**धुळे, दि.९- नाशिक येथील लिंगपिसाट भोंदू अशोक खरात याच्या गुन्ह्यांची माहिती आणि स्वरूप पाहिल्यानंतर राजकारणाचे बिभत्स स्वरुप पहायला मिळते. येथे जन्म घेतल्याची मोठी किंमत जनता चुकवत आहे. महागाई, बेराजगारी, शेतीमालाचे भाव, दिवसागणीक गॅस, पेट्रोलचे चढते दर, महिलांची आणि देशाची असुरक्षितता, या प्रश्नापेक्षा आसाराम बापू, राम-रहिम अशा अनेक लिंगपिसाट भोंदूच्या यादीत अशोक खरातची भर पडली आहे.**

भोंदू खरातला मोक्का लावून कारवाई करा. ज्यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे खतपाणी घातले त्यांच्या विरूध्द देखील कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी माजी आमदार अनिल गोटे यांनी केली आहे. नाशिक येथील अशोक खरात भोंदू बाबाचे कारनामे उघडकीस आले आहेत. त्याने आर्थिक फसवणूक करताना अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याची माहिती तपासात पुढे आली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार अनिल गोटे यांनी पत्रकार परिषद घेत काही मुद्दे आणि प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याचवेळी सत्ताधाऱ्यांवर धारदार शब्दांनी टीका केली आहे. यासंबंधी माजी आमदार गोटे म्हणाले, खरातचा विषय आम्हीच शोधून काढला, अशी फुशारकी राज्याचे गृह तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मारत आहेत. पण, इतकी वर्षे फडणवीस यांच्या छत्रछायेखाली हे विकृत उद्योग अखंडपणे सुरु होते. खरे तर हे त्यांचे अपयश आहे, हे जनतेच्या लक्षात (पान ४ वर)

## महामार्ग तीन समस्यांचे माहेरघर; सोनगीरमध्ये रास्तारोकोचा इशारा

**सोनगीर दि.९ (प्रतिनिधी)- मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीन वर सोनगीर गावाजवळ निर्माण झालेल्या विविध समस्यांमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले असून, या अडचणींचे तातडीने निराकरण न झाल्यास सुरू असलेले उड्डाणपुलाचे काम बंद पाडून 'रास्ता रोको' आंदोलन करण्याचा इशारा सोनगीर ग्रामपंचायतीने दिला आहे. याबाबतचे निवेदन राष्ट्रीय राजमार्ग विकास प्राधिकरणाच्या प्रकल्प संचालकांना देण्यात आले आहे.**



प्रकल्प संचालकांना दिलेल्या निवेदनात ग्रामपंचायत प्रशासनाने ग्रामस्थांची कैफियत मांडली आहे. निवेदनाचा आशय पुढीलप्रमाणे, सोनगीरच्या पूर्व भागातील बालाजी नगर, लक्ष्मी नगर आणि नवीन वसाहतींना जोडणाऱ्या अंडरपासची स्थिती अत्यंत दयनीय आहे. सद्यस्थितीत या बोगद्याची उंची केवळ अडीच मीटर आणि रुंदी तीन मीटर आहे. उंची कमी असल्याने मोठी वाहने येथून जाऊ शकत नाहीत. तसेच हा अंडरपास जमिनीच्या पातळीपेक्षा खाली असल्याने तिथे नेहमी सांडपाणी साचलेले असते. यामुळे वयोवृद्ध, महिला आणि विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. या अंडरपासची उंची चार मीटर आणि रुंदी आठ मीटर करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच वाघाडी फाटा येथे सध्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. मात्र, बाभळेच्या दिशेने अनावश्यकरीत्या लांब सर्व्हिस रोड बनवला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जुना सर्व्हिस रोड आणि नवीन रोड यामध्ये अडीचशे मीटरचा गॅप पडणार असल्याने गावातील वाहतुकीची मोठी कोंडी होणार आहे. चॅनल क्र.१२८३ पासून ६५० मीटरचा सर्व्हिस रोड रस्त्याच्या दोन्ही बाजूस बस स्टँडकडे तयार करून जुन्या रस्त्याला जोडल्यास ग्रामस्थांची सोय होईल, असे निवेदनात नमूद केले आहे. नवीन (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,38,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,51,000 रु.+3% GST
चांदी- 2,42,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

जांभुळ ज्युस मिळेल




नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
संकेत नित्या फार्म
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३१६, २३८३१६

## नंदुरबारमध्ये शाळा प्रकरणी उबाठा गटाचे धरणे
## आंदोलन तीव्र; चोवीस तासांत कारवाईचा इशारा

**नंदुरबार, दि.९ (प्रतिनिधी)- अल्पवयीन विद्यार्थिनीवरील अत्याचार प्रकरणात गुन्हेगारास पाठबळ देणाऱ्या संस्थाचालक व मुख्याध्यापकांवर तात्काळ गुन्हा दाखल करावा तसेच संबंधित शाळेवर शासकीय प्रशासक नियुक्त करावा, या मागण्यांसाठी शिवसेना ठाकरे गटाकडून सुरू असलेले धरणे आंदोलन आज ४ थ्या दिवशीही सुरू आहे.**

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, पुढील २४ तासांत संबंधित मुख्याध्यापक व संस्थाचालकांवर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल न झाल्यास हे आंदोलन तीव्र जनआंदोलनात परिवर्तित करण्यात येईल. तसेच शासन स्तरावर आमरण उपोषण छेडले जाईल किंवा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात येईल.या प्रकरणात शिक्षक उमेश अशोक शिंदे याने श्रीमती डी. आर. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता १२ वीतील अल्पवयीन विद्यार्थिनीस फुस लावून पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.मुख्य आरोपी अटकेत असला तरी, त्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करणारे तसेच पुरावे दडवण्याचा आरोप असलेले मुख्याध्यापक व संस्थाचालक अद्याप कारवाईच्या बाहेर असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे संबंधितांवर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी आणि शाळेवर प्रशासक नेमावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

या आंदोलनात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष पंडीत कौतिक माळी, (पान ४ वर)

## नवस फेडण्यासाठी कार्यकर्ते अजमेरला

नंदुरबार, दि.९ (प्रतिनिधी)- नंदुरबार येथील शिवसेनेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी यांची प्रकृती काही दिवसांपूर्वी बिघडली होती. त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी शहरातील अनेकांनी प्रार्थना केल्या तसेच हिंदू-मुस्लिम बांधवांनी आपापल्या श्रद्धेनुसार नवस केले होते. याच पार्श्वभूमीवर येथील मुस्लिम कार्यकर्त्यांनी आमदार रघुवंशी यांच्या प्रकृतीसाठी अजमेर शरीफ येथे जाऊन दर्शन घेण्याचा नवस केला होता. आता आमदारांची प्रकृती सुधारल्यानंतर हा नवस फेडण्यासाठी मुस्लिम कार्यकर्ते एसटी बसने राजस्थानमधील अजमेर शरीफकडे बुधवारी रात्री रवाना झाले (पान ४ वर)

## अपघातांचे प्रमाण दहा टक्क्यांनी कमी करण्यात जिल्हा पोलीस दल यशस्वी

**धुळे, दि.९- राज्याच्या पोलीस महासंचालकांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व जिल्ह्यांमध्ये किमान दहा टक्के प्राणांतिक अपघात कमी करण्यासाठी आज जिल्हा पोलीस दलातर्फे विशेष बैठक घेण्यात आली. दरम्यान, २०२५ मध्ये राज्यातील नऊ जिल्ह्यांनी दहा टक्क्यांपेक्षा जास्त प्राणांतिक अपघात कमी केले असून त्यात धुळे जिल्ह्याचा सातवा क्रमांक आला आहे. आगामी वर्षातही अशा प्रकारे प्रभावी उपाययोजना राबवून अपघातांचे प्रमाण कमी करण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.**

पोलिस महासंचालकांनी सन २०२६ मधे सर्व जिल्ह्यांना किमान दहा टक्के प्राणांतिक अपघात कमी कार्यासाठी सर्व स्थरावर प्रयत्न आणि उपाययोजना करण्याचे आदेश दिलेले आहेत. या अनुषंगाने धुळे जिल्ह्यात आज सर्व अधिकाऱ्यांची वाहतूक प्राणांतिक अपघात कमी करण्याच्या दृष्टीने बैठक घेण्यात आली. या बैठकीकरिता महामार्ग प्राधिकरणचे हितेश अग्रवाल, सार्व.बांधकाम विभागाचे आर. आर. पाटील, आरटीओ मोहित सोनवणे व इतर (पान ४ वर)

# आपला महाराष्ट्र

## बुवाबाजीतून स्त्रियांचे शोषण आणि निमगुळचा आदर्श

नाशिक जिल्ह्यातील अशोक खरातचे प्रकरण सध्या सर्व प्रकारच्या प्रसिद्धी माध्यमांवर गाजत आहे. त्या प्रकरणाची व्याप्ती एवढी मोठी असेल याची कल्पनाही करवत नाही. हळूहळू त्याच्या गोरख धंद्यांचे हीमनग पुढे येत आहेत. महिला देखील तक्रार करण्यासाठी पुढे आलेल्या आहेत. त्याने अनेक महिलांचे शोषण केले. हळूहळू त्या प्रकरणातील व्यापकता वाढत आहे. सोबतच आपला समाज सुशिक्षित असूनही किती लालची आणि महत्वाकांक्षी आहे ते देखील या प्रकरणातून दिसून आले. उच्चपदस्थांसहित अनेक उच्चभ्रू महिला खरातच्या जाळ्यात अडकल्या होत्या. काय हवे होते त्यांना? त्यांच्याकडे अमाप संपत्ती होती , प्रतिष्ठा होती, समाजात मानमरातब होता, घरात त्या सुखी आणि समृद्ध होत्या. तरीही चमत्कार, त्यांना का खुणावत होते अशा मुद्द्यांवर समाजातील विद्वानांनी कधीच विचार केलेला नाही. शिक्षणात विवेकाच्या ऐवजी अविवेकी आणि कर्मकांडांचा अभ्यासक्रम येतो. विद्यापीठातून फल ज्योतिष शिकविले जाते. अशा प्रकारच्या अधोगतीतूनच सुशिक्षित म्हणवला जाणारा समाज भरकटत चालला आहे. खरात प्रकरणानंतर लगेचच एका बहुराष्ट्रीय कंपनीतील महिलांवरील अत्याचाराचे प्रकरण बाहेर आले आहे. ९ गुन्हे या संदर्भात दाखल झाले आहेत. पुरुष कर्मचाऱ्यांकडून कंपनीत कार्यरत असलेल्या महिलांचा विनयभंग, लैंगिक आणि मानसिक छळ तसेच धार्मिक भावना दुखावल्या गेलेल्या तक्रारी पुढे आल्या आहेत. दुसरीकडे साक्री तालुक्यातील मलांजन येथील शेतात काम करणाऱ्या महिलेवर अत्याचार झाला तसेच तिच्या छोट्या मुलीचा देखील अनन्वित छळ करण्यात आला. या प्रकरणात दोघे शेतकरी आरोपी आहेत. त्यांच्या शेतातच ही महिला काम करीत होती. जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यात एका खाजगी माध्यमिक शाळेच्या शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थीनीवर सतत तीन वर्षे अत्याचार केला. आक्षेपार्ह छायाचित्रे काढून ती समाज माध्यमांवर प्रसिद्ध करण्याची धमकी दिली. हा अत्याचार असह्य झाल्यामुळे संबंधित मुलीने आपल्या आई-वडिलांना घडलेली हकिकत सांगितली. त्यामुळे तिच्या पालकांसहित अनेक संबंधितांनी त्या शिक्षकाला चोप दिला आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. अशा अनेक घटना सांगता येतील.

यावरून आपल्या लक्षात येईल की पुरोगामी महाराष्ट्रात महिला अजिबात सुरक्षित नाहीत. पार्टी विथ डिफरन्स अशी सारखी जाहिरात करणाऱ्या पक्षाच्या हातात गृह खाते आहे. मात्र गेल्या तीन-चार वर्षात असंख्य महिलांचे शोषण झाले आणि कुठलीही कारवाई झाली नाही. ही वस्तुस्थिती आहे. दुसरीकडे नवशिक्षित नवश्रीमंत महिला कर्मकांडात, पूजा अर्चेत मोठ्या प्रमाणावर गुंतल्या आहेत. त्यातून बाहेर पडायला त्या तयार नाहीत. ही स्थिती धर्मांधता अभिप्रेत असलेल्या गटांना अतिशय प्रिय आहे. यातून अध्यात्माच्या नावाखाली अनेक अध्यात्मिक म्हणवल्या जाणाऱ्या घटकांच्या पायाशी लीन होण्याचे प्रमाण वाढले. त्यातूनच शोषणाचे प्रकार वाढलेले दिसतात. आपल्या संविधानाने धर्म स्वातंत्र्याचे अधिकार व्यक्तीला प्रदान केलेले आहेत. कुठल्या धर्माचा कोणता विचार आपण स्वीकारायचा त्यासंबंधीचा निर्णय व्यक्ती घेऊ शकते. कुठल्याही धर्माची उपासना आणि त्यानुसार पूजा करण्याचे स्वातंत्र्य देखील घटनेने दिले आहे. मात्र त्याचा गैरफायदा घेत व्यक्तिगत पातळीवरील श्रद्धा सार्वजनिक पातळीवर आणून गल्ली गल्लीत त्याचे स्तोम माजविण्यात आलेले असून घरातल्या व्यक्तिगत पूजा अर्चेचा भाग रस्त्यावर आणि प्रत्येक वसाहतीत आला आहे. यात मोठ्या प्रमाणावर महिलांचा भरणा आहे. ही सर्व परिस्थिती चिंताजनक म्हटली पाहिजे. मात्र चोहिकडे अशाप्रकारची बिघडलेली परिस्थिती असताना काही सकारात्मक व पुरोगामी वाटचालीच्या दिशेने जाणाऱ्या घटनाही घडतात ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हटली पाहिजे. धुळे तालुक्यातील निंमगुळ या गावी बचत गटाच्या महिला सदस्यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने घेतलेला निर्णय हा आदर्शवत असून त्याचे अनुकरण प्रत्येक गावाने केले पाहिजे असाच आहे. या गावातील महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून गावकऱ्यांच्या सहकार्याने कुठल्याही प्रकारच्या बुवा बाबांना गावात प्रवेश नाकारण्याचा निर्णय घेतला, तसा ठराव सुद्धा मंजूर केला आहे. त्याबद्दल निमगुळच्या महिलांचे मनापासून आभार मानले पाहिजेत. त्यांनी पुरोगामी महाराष्ट्रातील पुरोगामी विचारसरणीच्या दिशेने एक सक्षम पाऊल टाकलेले आहे. अशा प्रकारे एका गावाने पुढाकार घेतला की दुसरे गाव तयार होऊ शकते.एक पणती कोपऱ्यातला अंधार पळवून लावण्यास पुरेशी आहे असे आमचे मत आहे. एका पणतिने दुसरी पणती पेटते आणि सर्वत्र प्रकाश पसरतो तसे वातावरण तयार होण्याची वेळ आलेली आहे. त्यासाठी विवेकवादी जीवनशैली किंवा विचारधारेचा स्वीकार करून जळमटे फेकून देण्यासाठी पुढे आले पाहिजे. निमगुळच्या महिलांनी त्या संदर्भात मोठे पाऊल उचलले असे आम्ही मानतो.

महिलांच्या शोषणाच्या अशा प्रकारच्या घटना महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर घडत आहेत त्यामुळे राज्यात कायद्याचा धाक आहे की नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. विशेष करून बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच शिक्षण संस्थांमध्ये महिलांवरील अत्याचारांचे प्रसंग वरच्यावर पुढे येत आहेत. शिक्षण संस्थांमध्ये किंवा शाळांमध्ये महिला सुरक्षित आहेत असे आपण गृहीत धरतो परंतु नेमकी तिथेही आता परिस्थिती बिघडली असून शिक्षण क्षेत्रात अपप्रवृत्ती अंगात असणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली दिसते. शिक्षण संस्थांमध्ये म्हणूनच महिलांची सुरक्षितता अपेक्षित असताना नेमके तिथेच त्यांचे शोषण होते हे त्या व्यवस्थेचे आणि ती व्यवस्था चालविणाऱ्या घटकांचे तसेच सरकारचे देखील मोठे अपयश म्हणावे लागेल. पार्टी विथ डिफरन्स अशी पक्षाची जाहिरात करणे वेगळे आणि राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था ठिकठाक असणे वेगळे. प्रत्यक्षात सुव्यवस्था दिसत नाही. सभागृहात महिलांच्या सुरक्षिततेविषयी मोठमोठ्या घोषणा करणे, कायद्याचा बडगा दाखविणे, आणि कडक शिक्षेची तरतूद असणारे कायदे मंजूर करणे ही एक औपचारिकता निर्माण झालेली दिसते. प्रत्यक्षात कुणालाही कायद्याची (पान ३ वर)

## हस्ती बँकेच्या देवपूर शाखेचा वर्धापन दिवस उत्साहात मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**धुळे, दि.९- दि हस्ती को-ऑप बँक लि. देवपूर धुळे शाखेचा दहावा वर्धापन दिवस मंगळवारी ग्राहक जागरूकता मेळावा व सोबत मोफत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

बँकेचे संस्थापक अध्यक्ष स्व.हस्तीमलजी जैन यांची प्रेरणा घेऊन स्थापन झालेल्या हस्ती बँकेतर्फे दरवर्षी समाज हितासाठी विविध उपक्रम बँकेमध्ये राबवले जातात. समाजाचे आपण काही देणे लागतो तसेच आपल्यावर या देशाचे, गावाचे व समाजाचे ऋण आहे. या संकल्पनेतून बँकेचे अध्यक्ष कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात येतो. याप्रसंगी रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणीचे उद्घाटन सौ.राजुल संकलेचा, सौ.अल्पा अग्रवाल, सौ.पल्लवी गुजराथी,




सौ.शारदा पाटील, सौ.सुनिता गांधी, डॉ.हेमांगी चौधरी यांनी केले. शिबिरात शतायु हॉस्पिटल, धुळे व त्यांचे प्रमुख चिकित्सा तज्ञ यांनी देवपूर धुळे व परिसरातील गरीब व गरजू असलेल्या रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच नवजीवन ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने ६४ रक्तदात्यांचे रक्त संकलन करण्यात आले.

देवपूर धुळे शाखा समितीचे चेअरमन किशोरकुमार संकलेचा यांनी बँकेच्या प्रगतीबद्दल आणि समाजासाठी केलेल्या विविध कार्याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी बँकेचे व्हा.चेअरमन अक्षय छाजेड व समिती सदस्य किशोर पाटील, दिलीप चौधरी, नरेंद्र गांधी, उज्वल जैन, सौ.पल्लवी गुजराथी तसेच धुळे शाखेचे चेअरमन शरद पसारी समिती सदस्य मनिष उपाध्ये, जयेश संचेती व शाखेचे शाखा व्यवस्थापक राज सरक उपस्थित होते. शिबिरासाठी बँकेचे संचालक संजय दुग्गड, (रक्तप्रकल्प प्रमुख) यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या प्रसंगी देवपूर, धुळे शहराचे प्रतिष्ठित व्यक्ती व व्यापारी, सभासद, खातेदार, सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी बँकेचे कर्मचारी विशाल बाविस्कर, बुद्धदेव गवळे, यशस्वी अहिरराव, ज्ञानेश्वर महाले, रेणुका कोठावदे, भूपेंद्र परदेशी, लक्ष्मीकांत माने, साहेबराव पाटील पिग्मी एजन्ट नरेंद्र कुचेरिया गिरीष मेतकूटे संजय कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

## कहाटूळ विकास इंग्लिश मीडियम स्कूल येथे वार्षिक बक्षीस वितरण

**शहादा, दि.८ (प्रतिनिधी)- तालुक्यातील कहाटूळ येथील विकास इंग्लिश मीडियम स्कूल येथे वार्षिक बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विकास इंग्लिश मीडियम स्कूल येथे वर्षभरात विविध स्पर्धा घेण्यात येतात.**

या स्पर्धेमध्ये प्रत्येक विद्यार्थी कसा सहभागी होईल व त्याला पुस्तकी ज्ञान बरोबरच मैदानी खेळात कसे पारंगत करता येईल यावर शाळेचे प्राचार्य एम के गवळे यांचा मोठा भर असतो. द्वितीय सत्रामध्ये विविध मैदानी खेळ घेण्यात आले. यात रनिंग कॉम्पिटिशन, लाँग जंप कॉम्पिटिशन, म्युझिकल चेअर कॉम्पिटिशन, लेमन स्पून कॉम्पिटिशन असे विविध कॉम्पिटिशन घेण्यात आले. स्पर्धेमध्ये अव्वल कामगिरी करून टॉप थ्री मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर भेटवस्तू , प्रमाणपत्र व मेडल देऊन त्यांच्या गुणगौरव करण्यासाठी हा उपक्रम ठेवण्यात आला.



अध्यक्षस्थानी संस्थेचे विद्यमान संचालक प्रकाश जाधव पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून विकास इंग्लिश मीडियम स्कूलच्या समन्वयिका ताईसाहेब सौ प्रीती अभिजीत पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यादवराव माळी, उपाध्यक्ष भगवान पाटील, महिला उपाध्यक्ष सौ.आरती सोनवणे, माध्यमिक विद्यालयाचे पर्यवेक्षक हिरजी पाटील सर होते.कार्यक्रमाची सुरुवात विद्येचे प्रथम दैवत माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे शाल व गुलाब पुष्प देऊन स्वागत व सत्कार करण्यात आले. त्यानंतर वर्गानुसार विविध स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल देऊन त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांचे कौतुक करण्यात आले. शैक्षणिक वर्ष २०२५ /२६चा स्टुडन्ट ऑफ द इयरचा मान इयत्ता चौथीची विद्यार्थिनी वैष्णवी विठ्ठल जगताप हीला भेटला. तसेच पेरेंट्स ऑफ द इयरचा सन्मान कृष्णा काशिनाथ ठाकरे यांना देण्यात आला. तसेच टीचर्स ऑफ द इयरच्या सन्मान कु.यामिनी नंदकिशोर जगदाळे यांना भेटला. सदरील कार्यक्रमास मोठ्या संख्येत पालक वर्ग उपस्थित होता. समस्त पालकांनी मुलांच्या होत असलेल्या कौतुका बाबत आनंद व्यक्त केला.

सदर कार्यक्रम संस्थेच्या समन्वयीका ताईसाहेब सौ. प्रीती अभिजीत पाटील यांनी मार्गदर्शन करताना शैक्षणिक क्षेत्रातील पालकांची जबाबदारी पटवून दिली. शैक्षणिक क्षेत्रात संस्थाचालक, शिक्षक, पालक व विद्यार्थी हे चारही शिक्षण व्यवस्थेतील महत्त्वाची चार चाकी आहे. असं त्यांनी नमूद केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी कामिनी पाटील, गीतांजली पाटील, हेमलता राठोड, शितल पाटील, डिंपल बोरदे, हर्षदा पाटील, ज्योती पाटील यांनी मेहनत घेतली. तसेच माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक व कर्मचारी यांचे मोलाची सहकार्य लाभले.

## मंदाणे येथे श्री रामदेवजी बाबा मंदिरात आज प्राणप्रतिष्ठा सोहळा

**शहादा, दि.९ (प्रतिनिधी)- तालुक्यातील मंदाणे येथे जय सेवालाल महाराज ट्रस्ट बंजारा तांडा मंदाणे व समस्त ग्रामस्थांतर्फे श्री रामदेवजी बाबा मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

शहादा तालुक्यातील मंदाणे येथील दामळदा रस्त्यावरील बंजारा तांड्यावर दि.१० एप्रिलला शुक्रवारी सकाळी ९ वाजता संत रामेश्वर बापू यांच्या सत्संग तर दि.११ एप्रिलला श्री रामदेव महाराज कळमसरकर यांचा सत्संग आयोजित करण्यात आला आहे. तर दि.१२ एप्रिलला रविवारी सकाळी ११ वाजे पासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमांमध्ये पहिल्या दिवशी शोभायात्रा, मंडप प्रवेश तसेच गणपती कलश पूजन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शुक्रवारी सकाळी साडेसात वाजता शोभायात्रा व मंडप प्रवेश दुपारी दीड वाजता गणपती पूजन व कलश पूजन, पुण्याहवाचनम कार्यक्रम राहील. दुसऱ्या दिवशी शनिवारी प्राप्त पूजनम प्रसाद, वास्तुशांती, धन्यादिवस आदि कार्यक्रम सकाळी साडेसात वाजेपासून सुरुवात होणार असून दिवसभर विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. रविवारी सकाळी साडेसात वाजेपासून देवता जागृत प्रात स्मरणनम, प्रतिष्ठा होम उत्तरतंत्र आदि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व धार्मिक कार्यक्रमांसाठी धार्मिक विधी आचार्य राजेंद्र उपासनी करणार आहेत. श्री रामदेवजी बाबा मंदिरात होणाऱ्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांतर्फे तसेच संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृध्दी योजना नंदुरबार जिल्हा कमिटी सदस्य शिवाजी तोलाराम चव्हाण यांनी केले आहे.

## श्री बालाजी सहकारी पतसंस्था चेअरमनपदी प्रा.डॉ.नरेंद्र निकम

**सोनगीर दि.९ (प्रतिनिधी)- येथील श्री बालाजी माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालय शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेची नूतन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यात संस्थेच्या चेअरमनपदी प्रा.डॉ.नरेंद्र विक्रम पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.**



पतसंस्थेच्या कार्यालयात नुकतीच निवडबाबत बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक चेअरमन पी.एन. शिरसाट होते. याप्रसंगी आगामी काळासाठी संस्थेचे चेअरमन पदासोबतच इतर महत्त्वाच्या पदांच्या निवड जाहीर करण्यात आल्या.यात व्हाइस चेअरमनपदी प्रा.कैलास भास्कर दुसाने सचिव पदासाठी प्रा.डॉ.ज्ञानेश्वर बाबूलाल धनगर यांची निवड करण्यात आली.या निवडीवेळी नूतन कार्यकारिणीला शुभेच्छा देण्यासाठी माजी चेअरमन एच.एस. विसपुते, प्रा.डॉ.सी.पी. निकम, आर. एन. न्हावळदे, अर्चना अमृतराव कासार, शांताराम आसाराम कदम तसेच कर्मचारी दीपक रमेश पटेल आणि मोहन शिरसाट यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी कार्यरत असलेल्या या संस्थेवर अभ्यासू आणि अनुभवी व्यक्तींची निवड झाल्याबद्दल शैक्षणिक क्षेत्रातून आनंद व्यक्त होत आहे. पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

## शहाद्यात भारतीय जैन संघटनेतर्फे सक्षम कार्यशाळा

**शहादा, दि.९ (का.प्र.)- भारतीय जैन संघटना शहादा शाखेच्या वतीने परिसरातील तरुण उद्योजक, महिला आणि व्यावसायिकांसाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विभागामार्फत मिळणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी सक्षम या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.**

आजच्या स्पर्धात्मक युगात नवीन व्यवसाय सुरू करताना किंवा जुना व्यवसाय वाढवताना सरकारी योजनांची माहिती असणे आवश्यक आहे. या कार्यशाळेत प्रख्यात व्याख्याते निरंजन जुवा (अहमदाबाद) हे खालील विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.उद्यम रजिस्ट्रेशन प्रक्रिया,सरकारी कर्ज योजना आणि सब्सिडी (अनुदान), जीईएम आणि एमएसएमई ग्लोबल मार्टची माहिती,उद्योजकांना मिळणारे इतर कायदेशीर लाभ आणि सुविधा आदि माहिती देण्यात येणार आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.कांतीलाल टाटीया भूषवणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून रमेशचंद्र चोरडिया, ॲड. प्रदीप टाटीया, विजय चोपडा, फुलचंद लोढा,कैलास संचेती, नगरसेवक ललित छाजेड आणि भरत ओस्तवाल उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रम गुरुवार दि.९ एप्रिल रोजी सायंकाळी वाजता सुघोषा घंट मंदिर दादावाडी, शहादा येथे आयोजित करण्यात आला आहे. शहादा परिसरातील सर्व छोटे-मोठे दुकानदार, महिला उद्योजिका, तरुण स्टार्टअप्स आणि विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन खान्देश विभागीय उपाध्यक्ष भवरलाल जैन, विभागीय सदस्य मनोज कोचर, जिल्हा सचिव राकेश बोरा, शहर अध्यक्ष नंदकिशोर चोरडिया आणि सचिव संदीप चोरडिया यांनी केले आहे.व्यावसायिक प्रगतीसाठी सरकारी योजनांचे पाठबळ मिळवणे ही काळाची गरज आहे. तरी सर्वांनी सहपरिवार या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.




## स्वेस उर्दू हायस्कूलला प्रोजेक्टर भेट

धुळे- शिक्षक आमदार किशोर दराडे यांचे धुळ्यातील प्रतिनिधी रामकृष्ण कोठावदे व संजय सर यांनी धुळ्यातील नामांकित शाळा स्वेस उर्दू हायस्कूला भेट दिली. यावेळी आमदार निधीतून स्वेस उर्दू हायस्कूल ला एक प्रोजेक्टर भेट म्हणून दिले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाहत, पर्यवेक्षक लतीफ देशमुख आणि शाळेचे सर्व शिक्षक शिक्षिका व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## पाणपोईची सुविधा हवी

धुळे- शहराच्या तापमानाचा पारा ३८ अंशाच्या आसपास स्थिरावला आहे. वातावरणात कोरडेपणा वाढल्याने शहरात येणाऱ्या नागरिकांना कोरड पडत आहे. त्यामुळे शहरातील रहदारीच्या रस्तांवर आणि चौकात पाणपोईची सुविधा हवी अशी अपेक्षा नागरिकांची आहे. मनपाने बंद पाणपोईची देखभाल करुन त्या सुरु कराव्यात, अशी मागणी होत आहे.

## शिवमल्ल हनुमान मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम

पिंपळनेर, दि. (प्रतिनिधी)- हनुमान जयंतीनिमित्त पिंपळनेर-नवापूर मार्गालगतच्या शिवमल्ल हनुमान मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले.हनुमान चालीसा पठण, जन्मोत्सव, महा आरती, सत्यनारायण महापूजा, भूमिपूजन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.मयूर कासार, करणं मराठे, दिपक गांगुर्डे यांच्या हस्ते सपत्नीक सत्यनारायण महापूजा संपन्न झाली. मंदिरासमोर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. हजारो भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. भर पावसातही भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली, ज्यामुळे भक्तीभाव आणि श्रद्धेचे अनोखे दर्शन घडले. या कार्यक्रमाचे नियोजन श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, युवा संघर्ष ग्रुप, जागृती मित्रमंडळ, भातोजी महाराज दयाराम माळी टेकपाडा भिलाटी तसेच मल्याचापाडा येथील ग्रामस्थांनी केले.

## मनपामार्फत डॉ.आंबेडकर व म.फुले जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताह; विविध उपक्रमांचे आयोजन



**धुळे, दि.९- महात्मा ज्योतिबा फुले यांच्या निमित्त व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्ताने दि.८ ते १४ एप्रिल या कालावधीत सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत असून त्यासाठी धुळे महानगरपालिका मार्फत विविध कार्यक्रम घेण्यात आलेले आहे. या कालावधीत सामाजिक समता सप्ताह साजरा करण्याबाबतचे नियोजन करण्यात आलेले आहेत. या सप्ताहाचा शुभारंभ दि.८ एप्रिल रोजी औपचारिक पद्धतीने करण्यात आला.**

सदर सप्ताहासाठी नियोजित केलेल्या उपक्रमानुसार ९ एप्रिल रोजी पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात बांधकाम प्रमाणपत्र आयुक्त नितीन कापडणीस यांच्या हस्ते वितरित करण्यात आले तसेच सदर लाभार्थ्यांना घरकुल योजनेच्या निधीचा पहिला हप्ता वितरित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे उपायुक्त हेमंत निकम शहर अभियंता चंद्रकांत उगले तसेच लाभार्थी उपस्थित होते. यात भारतीय संविधानाची प्रस्ताविका नागरिकांना वितरित करणे तसेच महाविद्यालय आश्रम शाळा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व प्रतिपादन करणारे व्याख्यान वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघु नाट्य स्पर्धा आयोजित करणे, मनपा मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनेचा लाभ लाभार्थ्यांना वाटप करणे, महात्मा फुले जयंती निमित्ताने त्यांच्या सामाजिक कार्याविषयी विविध कार्यक्रम आयोजित करणे, ज्येष्ठ नागरिकांचे जनजागृती शिबिर, रक्तदान शिबिर आयोजित करणे तसेच शहरातील सर्व महत्त्वाच्या ठिकाणी तसेच अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांच्या वस्त्यांमधून स्वच्छता अभियान राबवणे, व्याख्यान, चर्चासत्र आयोजित करणे अशा स्वरूपाचे विविध कार्यक्रम धुळे महानगरपालिका मार्फत या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी विविध अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.













## पान १ वरुन

## प्रतिभा चाकणकरांची चौकशी होणार

जगदंब पतसंस्थेतील ३२ खात्यांची चौकशी नाशिक ग्रामिण पोलीस करणार आहेत. समता पतसंस्थेतील खात्यांची चौकशी शिर्डी पोलिसांकडून केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रतिभा चाकणकर यांची चौकशी होणार असल्याची विश्वसनीय सुत्रांची माहिती आहे.

**नकली वाघ, साप याचा तपास करायचा**

दरम्यान, आज न्यायालयात तपास अधिकाऱ्यांनी सांगितले की, आरोपी अशोक खरात लोकांना नकली साप आणि वाघ दाखवून घाबरवत असे. तसेच मंतरलेले खडे, चिंचोके विकून फसवणूक करत होता. महिलांना काही द्रव्य किंवा पेढे खाऊ घालून अत्याचार केल्याचा संशय आहे. त्या पदार्थांमध्ये काय मिसळले जात होते, याचा तपास करणे आवश्यक आहे. तसेच नकली साप, वाघ आणि इतर साहित्य तो कुठून आणत होता, याचाही तपास बाकी असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे न्यायालयाने खरातला पाच दिवसांची पोलिस कोठडी दिली.

## काँग्रेस उमेदवाराची माघार

अपरिपक्व वक्तव्य केली. त्या संदर्भात कुटुंबांनी दिलगिरी व्यक्त केली. शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी ही विनंती आणि सूचना केल्या, अशी माहिती हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. यानंतर काँग्रेस नेतृत्वाशी चर्चा झाली. लढले पाहिजे ही आमची भूमिका आहे. मात्र संस्कृती आणि संवेदना म्हणून आम्ही बारामतीच्या पोटनिवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेत आहोत, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

**राहुरीत सात उमेदवार रिंगणात**

राहुरीचे दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या जागेवर विधानसभा पोटनिवडणूक होत आहे. यासाठी भाजप महायुतीने अक्षय कर्डीले यांना उमेदवारी दिली आहे. येथे सात उमेदवार असून शिवसेनेतील बंडखोरी कायम आहे. अक्षय कर्डीले हे शिवाजीराव यांचे सुपुत्र असून येथील मतदारसंघात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्राजक्त तनपुरे हेही निवडणुकीच्या मैदानात चर्चेत होते. मात्र, ऐनवेळी त्यांनी माघार घेतल्यानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीने गोविंद मोकाटे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे येथे निवडणूक होणार हे निश्चित मानले गेले. उमेदवारी अर्ज माघारीची मुदत संपत असताना सात उमेदवार रिंगणात कायम आहेत. भाजपकडून ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करण्यात आले. मात्र, सात उमेदवार शिल्लक राहिल्याने आता मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून गोविंद मोकाटे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. प्रामुख्याने या दोन पक्षातच थेट लढत होत असली तरीही, वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून संतोष चोळके उमेदवार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी जिल्हा प्रमुख रावसाहेब खेवरे हेही अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या मैदानात आहेत. राहुरी येथील पोटनिवडणूकीत अक्षय कर्डीले(भाजप महायुती), गोविंद मोकाटे (राष्ट्रवादी शरदचंद्र पवार), संतोष चोळके (वंचित बहुजन आघाडी), अथर्व म्हसे (अपक्ष), रावसाहेब खेवरे (अपक्ष), सूर्यभान लांबे (अपक्ष) महेश हापसे (अपक्ष) उमेदवार आहेत.

मतदान २३ एप्रिल, निकाल ४ मे

बारामतीच्या निवडणुकीतून माघार घ्या, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा मला फोन आला होता. परंतु देवेंद्र फडणवीस यांचा फोन येण्याचा आणि निर्णय घेण्याचा काहीही संबंध नाही. देवेंद्र फडणवीसांनी संस्कृती हा शब्द वापरला. तसेच माघार घेण्यासाठी अनेकांनी कळकळीची विनंतीही केली, अशी माहिती हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीस निधन झाले. त्यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुक होत आहे. बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी येत्या २३ एप्रिलला मतदान होईल. त्यानंतर चार मेस निकाल जाहीर केला जाईल.

## बनावट मद्य कारखान्यावर पोलिसांचा छापा

लाख त्रेचाळीस हजार दोनशे नव्वद रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बनावट दारू बनविणाऱ्या रवींद्र महाजन विरोधात चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन येथे भा.न्या.सं.कलम १२३, ३१८(४), ३३६(३), ३४९, ३५०(२) सह महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ), (ब), (क), (फ), (ई), ६७, ८३ व ८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि. श्रीराम पवार, पोउनि.अमरजित मोरे, अंमलदार पवन गवळी, सचिन गोमसाळे, आरीफ पठाण, राहुल सानप, देवेंद्र ठाकूर, व मयुर पाटील यांनी केली.

## शालेय विद्यार्थिनींमध्ये राडा

नव्हते. बसस्थानकातील हा गोंधळ पाहून एका सुज्ञ नागरिकाने तत्काळ पोलीस ठाण्यात फोन करून माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस व्हॅन कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाली. खाकी गणवेश दिसताच मारहाण करणाऱ्यांचा जोर ओसरला. पोलिसांनी तत्काळ संबंधितांना पोलीस व्हॅनमध्ये बसवून पोलीस ठाण्यात नेले. पोलीस स्टेशनमध्ये नेल्यानंतर पोलिसांनी संबंधित मुलींच्या पालकांना व नातलगांना पाचारण केले. सामोपचाराने चर्चा घडवून आणत पोलिसांनी या प्रकरणावर पडदा टाकला असल्याचे कळते.मात्र या सर्व भानगडीचे मूळ कारण काय होते हे संध्याकाळपर्यंत समजू शकले नाही.

**सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

शहादा बसस्थानकात शाळा-महाविद्यालये भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत विद्यार्थ्यांची गर्दी असते. अशा वेळी येथे कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त असणे गरजेचे आहे, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात आली आहे.तसेच बसस्थानकात सुरक्षिततेसाठी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरू आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.जर कॅमेरे सुरू असतील, तर या घटनेचे फुटेज तपासून पोलिसांनी दोषींवर कडक कारवाई करावी, अशी प्रतिक्रिया प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केली आहे.वारंवार होणाऱ्या अशा घटनांमुळे बसस्थानक परिसर असुरक्षित बनत चालल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.एसटी प्रशासन यावर काय ठोस पावले उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गंगाराम हॉस्पिटल अ‍ॅण्ड रिसर्चचे..

शस्त्रक्रिया अर्थात दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया तसेच उच्च तंत्रज्ञानाने व त्यांच्या वैद्यकीय ज्ञान कौशल्याने या कुटूंबियांनी परिसरातील असंख रूग्णांना या विकसित तंत्रज्ञानाचा लाभ मिळवून दिला. तसेच उच्चस्तरीय वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या.

डॉ.आदित्य श्रीराम भतवाल हे उत्तर महाराष्ट्रातील पहिले एम.सीएच. जीआय सर्जन आहेत तसेच डॉ.गायत्री भतवाल व डॉ. पल्लवी भतवाल या स्त्री रोग, प्रसुती शास्त्रात प्रवीण आहेतच तसेच वंधत्व निवारणासाठी त्यांनी टेस्ट ट्युब बेबी सेंटर २०१६ साली सुरू केले.२०२४ साली भारतातील अग्रगण्य टेस्ट ट्युब बेबी सेंटरची श्रृंखला इंदिरा आयव्हीएफ सोबत संलग्न केल्यामुळे त्यांच्या संपूर्ण भारतातील अनेक शाखांच्या अनुभवाचा रूग्णांना लाभ होत आहे. आता गंगाराम हॉस्पिटलच्या माध्यमातून त्यांनी वैद्यकीय सेवा विस्तृत केल्या आहेत. वर्धापन दिनानिमित्त त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा !

## वार शिवारात शॉर्ट सर्किटमुळे आग

गावकऱ्यांच्या प्रसंगावधानामुळे आग इतरत्र पसरली नाही आणि पुढील मोठा अनर्थ टळला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, शेतीपयोगी साहित्याचे लाखोंचे मोठे नुकसान झाले आहे. महसूल विभाग आणि वीज वितरण कंपनीने या नुकसानीचा तत्काळ पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय भरपाई द्यावी, अशी मागणी आता ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## पान १ वरुन

## लिंगपिसाट खरातवर मोक्का लावा

आले आहे. राज्यात कुठेही काही होताच, मुख्यमंत्री फडणवीस पहाटे आरवणाऱ्या कोंबड्याप्रमाणे घोषणा करतात की, हे खपवून घेतले जाणार नाही. कुणी किती का मोठा असेना, त्याला सोडणार नाही, असे सांगतात. जणू राज्यातील कायदा आणि सुरक्षितता चिरेबंद आहे. पोलीस ठाण्यात आमदार विरोधकावर गोळ्या झाडतो, बीड जिल्ह्यात सरपंच देशमुख यांची निघृण हत्या, पुण्यातील कोयता गँग, अनेक शहरात दिवसा होणारा गोळीबार, धुळ्याच्या गुलमोहोर रेस्ट हाऊसमध्ये पकडून दिलेले एक कोटी ८४ लाख, ८४ हजार, दोनशे रुपयांची खंडणी, अशा अनेक घटना आहेत. यातून राज्यकर्त्यांनी पोलिसांची प्रतिमा खाकी गणवेश घालणाऱ्या बस चालक-वाहकापेक्षा वाईट केली आहे, अशी टीका गोटे यांनी केली.

**कोट्यावधी सापडले, कारवाई काय**

धुळ्यातील विश्रामगृहात सापलेल्या रक्कमेच्या पोलीस तपासाबाबत मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली. दोन दिवसात एस.आय.टी. स्थापन करु, आमदारांना शिस्त लावू, विधीमंडळाच्या अस्मितेचा प्रश्न आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस बरेच काही बोलले होते. पण, अकरा महिने झाले, आजतागायत एकही अटक नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातील सी.सी.टी.व्ही. चित्रीकरण बेपत्ता झाले. तब्बल दहा दिवसांनी पोलीस प्रमुखांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला.

पोलीस, सरकारी वकील सर्व जण संशयित किशोर पाटील यास मदत करीत आहेत. तुम्ही साधी चौकशी होवू देत नाही. हेच प्रशिक्षण घेतले का संघाच्या शाखेवर? आम्हांला तर प्रामाणिकपणाचे धडे दिले होते. कदाचित नंतर अभ्यासक्रम बदलला असावा, अशी खोचक टीका गोटे यांनी केली आहे.

**हातळणी केवळ ब्लॅकमेलींगसाठी**

लिंगपिसाट भोंदू अशोक खरातच्या दरबरारात आमदार, मंत्र्यांनी हजेरी लावली. शेकडो कॉल्स केले, असे उघड करणाऱ्या अंजली दमानियांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयतक होत आहे. सर्व प्रथम या लिंगपिसाटाला मोक्का लावा. ज्या घोषणा तुम्हाला पेलवत नाहीत, त्या करूच नका. ज्यांनी ज्यांनी लिंगपिसाटशी संपर्क केला. त्यांच्या विरुद्ध काय कारवाई करणार? हे राज्याच्या जनतेला कळू द्या. अशा प्रकरणांचा उपयोग केवळ राजकीय ब्लॅकमेलींग करण्यासाठीच होतो, असे माझे मत असल्याचे गोटे यांनी सांगितले.

## उड्डाणपुलाचे काम बंद पाडण्याचा इशारा

वाघाडी फाटा उड्डाणपुलाच्या सर्व्हिस रोडवर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी दोन्ही बाजूंना पथदिवे बसविण्यात यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे.अनेक वर्षांपासून या समस्या प्रलंबित आहेत. नवीन उड्डाणपुलाच्या कामात जर या दुरुस्त्या केल्या नाहीत, तर सोनगीरचे नागरिक विकासापासून वंचित राहतील. जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर आम्ही काम बंद पाडून तीव्र आंदोलन करू. असा इशारा ग्रामपंचायत प्रशासन व ग्रामस्थ, सोनगीर यांनी प्रशासनाला दिला आहे.

सध्या मे. सिरत कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्यामार्फत उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. याच काळात वरील तांत्रिक बदल मंजूर करून काम पूर्ण करावे, अन्यथा होणाऱ्या आंदोलनास आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नास पूर्णपणे महामार्ग प्राधिकरण जबाबदार राहील, असे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे. या निवेदनावर ग्रामपंचायत प्रशासक लखन ठेलारी, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी ज्ञानेश्वर चौधरी, ग्रामपंचायत पदाधिकारी शामकांत माळी,राजेंद्र जाधव, विशाल कासार, केदारेश्वर मोरे,रवींद्र सूर्यवंशी, पिंटू भिल,समाधान पाटील, अल्ताफ कुरेशी, मुन्ना पठाण तसेच पत्रकार पी. के.शिरसाठ,माजी पंचायत समिती सदस्य चेतन चौधरी ग्रामस्थ मुकेश जाधव,पराग अहिराव,नितीन निझर आदींच्या सह्या आहेत.

## उबाठा गटाचे धरणे

रमेश नामदेव पाटील, सुनिल रामा पवार, दिनेश सोनवणे, अक्षय श्रीखंडे, डॉ. हेमंतकुमार शर्मा, इस्मीयाज कुरेशी, खंडु माळी, निंबा पाटील, बापु राजपुत, शेखर जाधव, निलेश चौधरी, सौ. सोनल चव्हाण, सौ. संगीता खंडु माळी, सौ. दिलाली वाघ, सागर पाटील, आनंदा पाटील, विक्की, पंकज माळी, कल्पीत नाईक, बबलु सोनार, बापु धनगर व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवस फेडण्यासाठी कार्यकर्ते अजमेरला

असून गुरुवारी तेथे दर्शन घेणार आहेत.या नवस फेडण्यासाठी आमदार चंद्रकांत रघुवंशी देखील उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, रवाना होण्यापूर्वी आमदार रघुवंशी यांनी मुस्लिम कार्यकर्त्यांची भेट घेत त्यांच्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी नगरसेवक परवेज खान यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## अपघातांचे प्रमाण दहा टक्क्यांनी कमी

अधिकाऱ्यांना देखील बोलावण्यात आले होते. बैठकी करिता धुळे जिल्यातील प्राणांतिक अपघाताचे प्रेझेंटेशन करण्यात आले आणि ग्राउंड लेवलवर सर्व संबंधित विभाग मिळून काय काय उपाययोजना करू शकतात यावर निर्णय घेण्यात आले. यामधे विविध डार्क स्पॉट्स आणि संबंधित यंत्रणेंकडून स्ट्रक्चरल बदल/ उपाययोजना या बाबत चर्चा झाली. त्याच प्रमाणे शहरातील विविध वाहतूक समस्येबद्दल आणि त्यांच्या निराकरणावर ही चर्चा झाली.

२०२५ मध्ये केवळ ९ जिल्ह्यांनी दहा % पेक्षा जास्त प्राणांतिक अपघात कमी केले असून, धुळे जिल्हा त्यापैकी एक आहे. जिल्ह्यात अपघात कमी करण्यात यशस्वी झालो आहोत. धुळे जिल्हा या मधे सातव्या क्रमांकावर आहे. पुढील काळातही अशीच कामगिरी करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.


रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

## धुळे जिल्ह्यात जनगणनेसाठी फिल्ड ट्रेनर्सचे प्रशिक्षण सुरू

**धुळे, दि.९- केंद्र सरकारच्या जनगणना २०२७ प्रक्रियेअंतर्गत जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात पहिल्या टप्प्यातील घरगणना प्रभावीपणे पार पाडण्यासाठी तालुकास्तरीय फिल्ड ट्रेनर्सचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. जनगणना संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई यांच्या निर्देशानुसार व जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली ११ एप्रिल पर्यंत प्रशिक्षण सुरू राहणार आहे.**



या प्रशिक्षणात धुळे जिल्ह्यातील शिरपूर, साक्री, शिंदखेडा तालुक्यांच्या ग्रामीण भागासाठी २६ फिल्ड ट्रेनर्स तसेच साक्री, शिरपूर-वरवाडे, शिंदखेडा नगरपंचायतींसाठी ८ आणि दोंडाईचा, पिंपळनेर नगरपरिषदेसाठी ४ अशा एकूण ३८ फिल्ड ट्रेनर्सना दि. ६ ते ८ एप्रिल दरम्यान पहिल्या सत्रात प्रशिक्षण देण्यात आले.तसेच दि.९ ते ११ एप्रिल या कालावधीत धुळे ग्रामीणसाठी १२, शिंदखेडा ग्रामीणसाठी ४ आणि धुळे महानगरपालिका क्षेत्रासाठी १७ फिल्ड ट्रेनर्सना द्वितीय सत्रात प्रशिक्षण दिले जात आहे. अशा प्रकारे संपूर्ण जिल्ह्यासाठी एकूण ७१ फिल्ड ट्रेनर्सना सहा दिवसांच्या प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षण दिले जाणार असून हे प्रशिक्षित फिल्ड ट्रेनर्स पुढे तालुकास्तरीय प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देणार आहेत, असे जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांनी सांगितले.धुळे जिल्ह्यातून भारतीय जनगणना २०२७ साठी मास्टर ट्रेनर म्हणून उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी अधिकारी कार्यालयातील ममता हटकर तसेच धुळे महानगरपालिकेतील कार्यालय अधिक्षक रवीकिरण पाटकरी यांनी पुणे येथील यशदा कार्यशाळेत प्रशिक्षण घेतले असून ते मार्गदर्शन करीत आहेत.जनगणना संचालनालय,मुंबई येथील सांख्यिकी अन्वेषक पार्थ पहाड यांची धुळे जिल्ह्यासाठी जनगणना समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. या प्रशिक्षणाद्वारे जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील घरगणना प्रक्रिया अचूक व परिणामकारकरित्या राबविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन दिले जात आहे.

## निधन वार्ता

### लता खत्री



धुळे, दि.९- शहरातील जुने धुळे झणझणी माता चौकातील रहिवासी लताबाई राजेंद्र खत्री-बारड यांचे अल्पशः आजाराने नाशिक येथे उपचारा दरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी त्या ५९ वर्षांच्या होत्या. नाशिक येथील अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

### निर्मला भागवत



धुळे, दि.९- देवपूर परिसरातील सत्संग कॉलनी प्लॉट नं.५३ निर्मलचंद्र येथील रहिवासी निर्मला चंद्रकांत सोनवणे यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६८ वर्षांच्या होत्या. एकवीरा देवी जवळील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्योती सिनेमाचे संचालक दिनेश माळी यांच्या त्या मावशी होत.

## अग्रवाल समाजातर्फे व्याख्यानाचे आयोजन

धुळे, दि.९- अग्रवाल समाजाच्यावतीने दि.११ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता महाराजा श्री अग्रसेनजी लॉन पांझरा नदी किनारी येथे चलती रहे जिंदगी या विषयावर द्वारकाजी जालान यांचे प्रबोधनात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.कुटूंबातील अंतर्गत कलह, वाढता ताणतणाव, अनिष्ट प्रवृत्तींचा समाजावरील परिणाम अशा समस्यांतून सहज बाहेर पडण्यासाठी तसेच सकारात्मक विचारांनी निर्मिती होण्यासाठी व्याख्यान दिशादर्शक ठरणार आहे. हा कार्यक्रम अग्रवाल विद्यार्थी शिक्षण सहाय्यक मंडळाच्या विशेष सहकार्याने आयोजित करण्यात येत आहे. व्याख्यानाचा लाभ राजस्थानी, मारवाडी,जैन,ब्राम्हण, गुजराथी समाज बांधवांनी घ्यावा असे आवाहन श्री अग्रवाल समाज, अग्रवाल युवक युवती मंडळ, महिला मंडळ, सहाय्यक मंडळ तसेच मेडीकल सेल तसेच अध्यक्ष डॉ.श्रीराम भतवाल, सचिव सुनिल अग्रवाल व कार्यकारिणीच्यावतीने करण्यात आले आहे.

**पाहिजेत**
हॉस्पिटल कामासाठी मुले व मावशी लागणार आहेत.
पात्रता : १२ वी व (MS CIT)
सिद्धहस्त ॲक्सिडेंट हॉस्पिटल
जीटीपी स्टॉप, देवपूर, धुळे
7821915567
8625030335
9021308536

## पाचवे पुण्यस्मरण



**कै.सौ.सरस्वतीबाई गणपतराव पवार**

(स्वर्गवास : दि.१०/४/२०२२, श्रीरामनवमी)

तुमचं असणं आयुष्यासाठी सर्व काही होतं, ते आमच्या आयुष्यातील सुंदर पर्व होतं, आज तुमच्या पुण्याईने सर्व काही असण्याची जाणीव आहे, पण तुमचे नसणे ही मोठी उणीव आहे.. परमेश्वर तुमच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना!

✻ शोकाकुल ✻

श्री.गणपत सजनराव पवार
श्री.बाजीराव उर्फ सुभाष सजनराव पवार
श्री.विजय यशवंतराव पवार — श्री.राजेश गणपतराव पवार
श्री.संजय दत्तात्रय पवार — श्री.प्रविण दत्तात्रय पवार
श्री.गौरव सुभाष पवार — श्री.नारायणराव लक्ष्मणराव जाधव
श्री.अक्षय विजय पवार — श्री.सचिन नारायणराव जाधव
बाळ गोपाळ बच्चे कंपनी
समस्त पवार परिवार, धुळे (बाळापूर)
श्री पवनपुत्र व्यायाम शाळा मंडळ, ग.नं.६, धुळे

**पाहिजेत**
सिनियर Tally Prime ऑपरेटर –१ (अनुभव १ ते २ वर्ष)
सेल्समन/मॅनेजर–२ (अनुभव १ ते २ वर्षे)
हेल्पर– २ ते ३ (अनुभव १ ते २ वर्षे)
इच्छूक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.
कृष्णा फोम अँड फर्निशिंग
अवधान, धुळे, मो.963753111, 9820918218

**शेतकरी माल खरेदी**
शेतकरी गहू, मका, ज्वारी व इतर शेतकरी माल कोणत्याही खर्चाशिवाय MIDC धुळे येथे खरेदी सुरु आहे.
-: संपर्क :-
9403453061
9673942025

**पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे.
-: संपर्क :-
कुंदन मल्टिसर्विसेस
फाशीपुल, धुळे
9545592444

**हॉल भाड्याने देणे**
धुळ्याच्या मध्यवर्ती ठिकाणी महाराणा प्रताप चौक येथे १५०० व ६०० स्क्वे.फूट हॉल भाड्याने देणे आहे.
9403300128

**पाहिजेत**
मेडीकल एजन्सीमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकौन्टंट
२) सेल्समन बाहेरगावासाठी
३) मदतनीस-हेल्पर
-: संपर्क :-
8408332975
9422287821

**भाड्याने देणे आहे**
गल्ली नं.४, बालाजी मंदिरा समोर, सिद्धी कॉम्प्लेक्समध्ये
१ ला मजला– १५०० c.f.
२ रा मजला– २५०० c.f. २५X१००
शिवाय टेरेस– २५X१०० (लिफ्टची सोय)
ऑफिस, बँक, फायनान्स कंपनी किंवा कमर्शियल परपससाठी भाड्याने देणे आहे.
संपर्क : 9623541474

**पाहिजेत**
लॉज कामासाठी मॅनेजर, वेटर पाहिजे. भेटा :-
हॉटेल रॉयल पॅलेस
बारा फत्तर चौक, धुळे
भेटण्याची वेळ : सायं,४-८
8830001376

**घर भाड्याने पाहिजे**
४ किंवा ५ रुमचे घर भाड्याने पाहिजे.
-: संपर्क :-
दत्तमंदिर चौकाजवळ देवपूर, धुळे
8390332124

**पाहिजेत**
नंदुरबार बस स्थानकात टू व्हीलर/फोर व्हीलर पार्किंग व्यवस्थापनासाठी कर्मचारी पाहिजेत
संपर्क :-
नरेश पाटील
8830660951

**पाहिजेत**
यश हॉस्पिटल, नगरपट्टी येथे हॉस्पिटल कामासाठी नर्सिंग स्टाप पाहिजेत.
संपर्क :- वेळ १० ते ७
यश हॉस्पिटल
नगरपट्टी, सुभाष पुतळासमोर, धुळे
02562-233102

**पाहिजे**
हेल्पर पाहिजे. माणूस FMCG मार्केट माल ने आण करणारा माणूस पाहिजे. तसेच बंगल्यावर साफसफाई करण्यासाठी माणूस पाहिजे.
-: संपर्क :-
9373929129

**पाहिजेत**
फार्मसिस्ट व मार्केटिंग कामासाठी D Pharm किंवा B Pharm
Health Ok
7588517991

**घर भाड्याने देणे**
अशोक नगर, पाण्याच्या टाकी मागे, लेनिन चौक, धुळे
7588517110

आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...






क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरूरत नहीं होती है !

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०